डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी),पुणे
(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे ४११००१
barti
सत्यमेव जयते
दूरध्वनी क्र. ०२०-२६३४ ३६००/२६३३ ३३३० फॅक्स :०२०-२६३३ ३५९६
E-mail: dg@barti.in Website: www.barti.in

जा.क्र./बार्टी/योजना/ क्रा.ल.सा.मा.IBPS/२०२३/ 250 दिनांक : 23/1/23

# शुध्दीपत्रक/Corrigendum

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांच्या कडून बँक (IBPS), रेल्वे व एल.आय.सी. इत्यादी व तत्सम पदाच्या स्पर्धा परीक्षेच्या पूर्व तयारीसाठी महाराष्ट्रातील अनुसूचित जातीतील मांग मातंग, मिनिमादिग, दखनी-मांग, मांग-म्हशी, मदारी, गारुडी, राधेमांग, मांग-गारोडी, मांग-गारुडी या घटकातील युवक व युवतींसाठी महाराष्ट्रातील पुणे, नाशिक, नागपूर, लातुर, अमरावती, औरंगाबाद, मुंबई येथे निवासी प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यासाठी प्रशिक्षण संस्थाची निवड (Empanelment) विहित अटी व शर्तीच्या अधीन राहून ६ महिने कालावधीचे निवासी प्रशिक्षण (कोचिंग) याप्रमाणे १ वर्ष कालावधीसाठी देण्याचा उपक्रम अशासकीय / खाजगी संस्थामार्फत राबविण्याकरिता दोन लिफाफा पध्दतीने (तांत्रीक लिफाफा व व्यापारी लिफाफा) ई- निविदा मागविण्याकरिता ई-निविदेची जाहिरात महाराष्ट्र शासनाच्या वेब साईट https://mahatenders.gov.in व https://barti.gov.in वर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. सदर निविदेची निविदा पूर्व बैठक दिनांक २७.१२.२०२२ रोजी संपन्न झाली. बैठकीनुसार निविदेबाबत पुढीलप्रमाणे शुध्दीपत्रक प्रसिध्द करण्यात येत आहे.

| ई निविदेमधील अटी व शर्ती क्र. | वाचावे (सुधारित मुद्दे) |
|---|---|
| मुद्दा क्र. ९. (क) (१) | सदर प्रशिक्षणाचा कालावधी १ वर्षाचा असेल. प्रशिक्षण कालावधी कमी करण्याचे किंवा वाढवण्याचे अधिकार मा. महासंचालक यांना राहतील. यामध्ये ३ वर्षापर्यंत मुदतवाढ देण्याचे अधिकार मा. महासंचालक यांच्याकडे राखीव राहतील.<br><br>सदर प्रशिक्षण निवासी असल्याने प्रशिक्षण संस्थेकडे असणाऱ्या सोयी सुविधा यानुसार प्रशिक्षण संस्थेस प्रशिक्षणासाठी प्रशिक्षणार्थीची संख्या कमी जास्त (५०, १०० किंवा १५० प्रशिक्षणार्थी ) करण्याचे अधिकार मा. महासंचालक यांच्याकडे राखीव राहतील. एखाद्या ठिकाणी एका पेक्षा जास्त प्रशिक्षण संस्थाची निवड करण्याचे अधिकार मा. महासंचालक यांना राहतील.<br>ज्या प्रशिक्षण केंद्राकडे ५० किंवा १०० प्रशिक्षणार्थीकरिता सोयी सुविधा उपलब्ध आहेत त्यांनी सदर ई-निविदा प्रक्रियेत सहभाग नोंदवावा. |
| मुद्दा क्र.८(१२) | प्रशिक्षण संस्थेकडे प्रशिक्षणार्थी करिता सोयी सुविधेसह निवासाची (मुले व मुली करिता) सोय अनिवार्य आहे. तसेच वसतिगृहात अभ्यासिका अनिवार्य राहील. प्रत्येक विद्यार्थ्यांकरिता गाद्या, कॉट बेडशीट, ब्लॅकेट, कपाटाची सोय असावी. पुरेशा खोल्या, विजेची सोय, पिण्याचे स्वच्छ पाणी, खोलीत पंखे, शौचालय इ. असणे आवश्यक |

| | |
|---|---|
| | वसतिगृहात भोजन कक्ष असावा. संबधीत सर्व कागदपत्रे, फोटो निविदा भरताना जोडणे अनिवार्य असेल. |
| | ई-निविदा भरताना निविदाधाकाने व्यापारी लिफाफा सादर करताना प्रति विद्यार्थी प्रशिक्षण शुल्क+ निवास खर्च+भोजन खर्च असा एकत्रित दर नमूद करणे आवश्यक आहे.<br><br>भोजनामध्ये सकाळी चहा व नाष्टा तसेच बिस्कीट आवश्यकतेनुसार, दुपार व संध्याकाळचे जेवण पोटभर (अमर्यादित) असावे. जेवणामध्ये शाकाहारी व मासांहारी जेवण आवश्यक (चपाती/भाकरी, १ सुकी भाजी, १ पातळ भाजी, वरण-भात, चटणी, लोणचे, पापड, मासांहार इ. पदार्थाचा समावेश राहिल ) |
| | शासन पत्र दिनांक २८/११/२०१३ च्या पत्रान्वये क्रांतिवीर लहूजी साळवे मातंग अभ्यास आयोगाच्या शिफारशीच्या अनुषंगाने अमरावती विभागस्तरावरील प्रशिक्षण केंद्र अकोला जिल्ह्याच्या ठिकाणी सुरु करण्याचे निर्देशित असल्याने अमरावती विभागाचे प्रशिक्षण केंद्र अकोला येथे करण्यात येत आहे. |
| | तांत्रिक गुणांकन मध्ये पात्र ठरलेल्या निविदाधारकांना Power point (PPT) Presentation करिता बोलावण्यात येईल. PPT मध्ये संस्थेचे उद्दिष्ट्य, यशस्वी विद्यार्थी, संस्थेकडे असणा-या सुविधा, प्रशिक्षणाचे मॉडेल व इतर गोष्टी याबाबत सादरीकरण करणे आवश्यक असेल.<br>सादरीकरणाकरिता तांत्रिक गुणांकन व्यतिरिक्त १० पैकी गुण देण्यात येतील. |

**विभाग प्रमुख**
**डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे.**